| | | |
|---|---|---|
| 20 | भारतीय महिला भावपटू : कामगिरीचा वाढता आलेख<br>डॉ. भास्कर माने | 75 |
| 21 | अवकाशातील तेजस्वी भारतीय तारका. प्रा. डॉ.शिवराज पाटील | 80 |
| 22 | महिला सबलीकरण एक दिशा प्रा. डॉ. व्यंकट इरवंतराव पाटील | 85 |
| 23 | खरचं महिला सबल झाल्यातं का ? प्रा. डॉ. बाजीराव माणिकराव पाटील | 87 |
| 24 | स्वातंत्र्याचे हिरक महोत्सवी वर्ष आणि महिला सबलीकरण<br>वाघमारे हिरामन लिंबराज | 90 |
| 25 | स्वतंत्र्योत्तर कालखंड आणि महिला सबलीकरण शशीकांत जाधवर | 95 |
| 26 | स्वयंसहाय्यता महिला बचत गटाचे कार्य विशेष संदर्भ जळकोट तालुका<br>सहा प्रा. डॉ. अल्का बाबाराव सोमवंशी | 102 |
| 27 | महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील मानदंड : लातूर पॅटर्न<br>लेफ्ट. डॉ. अर्चना टाक | 108 |
| 28 | भारतातील अमृत महोत्सवी वर्षातील सहकारी चळवळीचा विकास<br>आणि आव्हाने प्रा. डॉ. शिवाजी पाते | 112 |
| 29 | स्वातंत्र्याचे हीरक महोत्सवी वर्ष आणि महिला सबलीकरण<br>प्रा.डॉ.आचार्य आर.डी. | 115 |
| 30 | स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष आणि लोकशाही पुढची आव्हाने<br>प्रा डॉ माधव नरहरी कांबळे | 118 |
| 31 | आजादी का अमृत महोत्सवी वर्ष और बजेट में महिलाओं का विकास.<br>प्रा. डॉ. एन. पी. कूडकेकर | 122 |
| 32 | अमृत महोत्सवी वर्ष आणि माहिती तंत्रज्ञान डॉ. ढाकणे बालाजी निवृत्तीराव | 127 |
| 33 | नैसर्गिक आपत्ती आणि मराठी साहित्य सहा. प्रा. प्रशांत कांबळे | 130 |
| 34 | Azadi Ki Dimond Jubli Aur Maharashtra Mein Urdu Afsane Ka Safar.<br>Dr.Abdul Mujahid Ansari | 134 |
| 35 | زادی کی ڈائمنڈ جُبلی اور انفارمیشن ٹکنالوجی میں ہوئی ترقی<br>ڈاکٹر قمرالنسا ءبیگم Dr.Qamrunissa Begum Shaikh | 140 |

# महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील मानदंड : लातूर पॅटर्न

लेफ्ट. डॉ. अर्चना टाक
इतिहास विभाग प्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
Email – dept.of.history.rsml@gmail.com

नालंदा विद्यापीठ हे प्राचीन काळातील भारतातील एक नामवंत विद्यापीठ होते. नालंदा विद्यापीठात शिकणारा विद्यार्थी म्हटले की, समाजाचा त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळाच असायचा. नालंदा विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणजे "उच्च बौद्धिक क्षमता बाळगणारा विद्यार्थी" अशी समाजाची धारणा होती. आज लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या बाबतीत अगदी असेच आहे. राजर्षी शाहू महाविद्यालयाचा विद्यार्थी म्हटले की, समाज त्याच्याकडे आदराने पाहतो. अगदी बसमध्ये, भाजी मार्केटमध्ये, यात्रेच्या ठिकाणी, रस्त्यावरून चालताना कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी अगदी कुठेही कानावर प्रश्न पडला की, तू कोणत्या ठिकाणी शिकतोस? आणि आपण उत्तर दिले की, "राजर्षी शाहू महाविद्यालयात" की, समाज एका वेगळयाच आदराच्या भावनेने बघु लागतो. तेव्हा स्वत:विषयी अभिमान वाटल्याशिवाय राहत नाही. राजर्षी शाहू महाविद्यालय हे "मराठवाडयाचे नालंदा" आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. या महाविद्यालयाचा लौकिक खूप मोठा पसरलेला आहे. हे महाविद्यालय म्हणजे जणू काही चालत्या–बोलत्या हिऱ्या माणकांची व मौल्यवान रत्नांची खाणच, असा चमत्कार आज घडलेला आहे. याचे श्रेय निश्चितपणे संस्थाचालक व महाविद्यालयाला आजपर्यंत लाभलेले प्राचार्य यांना द्यावे लागेल.

सर्वच संस्थाचालकांनी व प्राचार्यांनी महाविद्यालयाचे हित लक्षात घेऊन अविश्रांत वाटचाल चालू ठेवली आहे. संस्थापक व संस्थाचालकांमुळेच हे महाविद्यालय गुणवत्तेच्या सर्वोच्च शिखरावर जाऊन पोहोचले आहे. या सर्वांनी समाजातील उपेक्षित क्षेत्राची जीवनाचे ध्येय म्हणून निवड केली. त्यातच आपले सर्वस्व पणाला लावून ते सतत कार्यशील राहीले. सार्वजनिक जीवनात चिकाटीने, निरलसपणे, प्रसिद्धी, पराङ्मुख राहून सेवा दिलेले त्यांचे जीवन व राजर्षी शाहू महाविद्यालयाचे कार्य नव्या पिढीला प्रेरणा देणारे का ठरू नये? एक सामाजिक घटक म्हणून समाजासाठी आपण काहीतरी करू शकतो, समाजाप्रती आपणही बांधलेले आहोत ही जाणीव स्वार्थीपणामुळे सर्वांच्याच मनात निर्माण होत नसते, ज्यांच्या मनात निर्माण होते ते मानवतेचे सेवक असतात.महाविद्यालयाचे संस्थाचालक हे त्यापैकीच आहेत. सामाजिक बांधिलकीच्या नात्याने आपण मानवता जपलीच पाहिजे असे त्यांना वाटते. समाज हा आपणच बनवतो व घडवतो. त्यांनी शिकलेली विद्या, त्यांना मिळालेली पदे, अधिकार त्यांनी समाजाच्या कल्याणासाठी वापरले. हेच परिपूर्ण व्यक्तिमत्व असते.

लातूर येथे १९६८ यावर्षी ग्रामीण भागातून आलेल्या उच्च शिक्षित बहुजन समाजातील काही लोक एकत्र आले व त्यांनी ॲड. श्री. किसनराव विठ्ठलराव साळुंके पाटील यांच्या नेर्तृत्वाखाली शिव छत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेने १९७० यावर्षी महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक क्रांतीचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या नावाने महाविद्यालय सुरू केले. त्यांचे नाव हेच या महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीची दिशा निश्चित करणारे ठरले. राखेतून जन्म घेणारा फिनिक्स पक्षी हे महाविद्यालयाने बोधचिन्ह निवडले. डॉ. जनार्दन वाघमारे या पुरोगामी विचार असलेल्या विचारवंताला प्राचार्य म्हणून बोलावण्यात आले. त्याबरोबर प्राचार्य अनिरूद्ध जाधव, प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे यांच्या तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या अथक मेहनतीच्या जोरावर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आलेख वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

तरीसुद्धा पहिल्या चार–पाच वर्षात महाविद्यालयाची म्हणावी तशी प्रगती झाली नाही. निकाल चांगले लागत परंतु विद्यार्थी संख्या वाढत नव्हती. शहरातील ज्या भागात शाहू महाविद्यालय सुरू करण्यात आले होते, तो भाग विद्यार्थी संख्या वाढण्यास कारणीभूत ठरला. फादर मॅशिचओ यांनी वेळोवेळी आर्थिक मदत केली. ४० एकर जमीन संस्थेच्या मालकीची होती. त्यातील उत्पन्नातुन वसतिगृहातील मुलांचा खर्च केला जात असे. शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आपले उभे आयुष्य खर्च केले. या राजांचा वारसा आपण चालवावा असे संस्थापकांना वाटले आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. श्री. विलासरावजी देशमुख, माजी खासदार मा. श्री. शिवराज पाटील चाकुरकर, मा. श्री. गोपीनाथराव मुंडे, माजी खासदार मा. श्री. रवी गायकवाड इत्यादींनी निधी उपलब्ध करून दिला. नवीन वास्तूच्या कोनशिलेचे अनावरण मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाची मोठी इमारत तयार झाली. खेडयांतून पोरं हळूहळू लातूरला आली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची तरूण मुलं या महाविद्यालयात येऊ लागली. भारत हा शेतीप्रधान देश आहे. तेव्हा शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा विकास झाला तरच देशाचा विकास होऊ शकतो. मात्र इथले शेतकरी पुढारलेले दिसून येत नाहीत. याचे कारण त्यांच्यात शिक्षणाचा अभाव आहे. शेतकऱ्यांची मुले घरापासून खूप दूर अथवा लांब बाहेरगावी जाऊन शिक्षण घेऊ शकत नाहीत. त्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी पाठविण्यासाठी शेतकरी अनुत्सुक असलेले दिसून येतात. याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे जर मुले बाहेरगावी शिकायला गेली तर शेतीच्या कामासाठी लागणारे मनुष्यबळ कमी पडेल व दुसरे म्हणजे शेतीतुन मिळणारे उत्पन्न कमी असल्यामुळे मुलांना बाहेरगावी पाठवून शिक्षण देण्याइतकी आर्थिक क्षमता शेतकऱ्यांची नव्हती. शिक्षण हा विकासाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक असतो. आपला परिसर स्वयंपूर्ण बनवायचा असेल तर इथे शिक्षणसंस्था असलीच पाहीजे. बहुजन समाजातील हुशार, होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना कमी खर्चात शिक्षण मिळावे यासाठी लातूर येथे शिव छत्रपती शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. ज्यांच्या वडिलांच्या शेतात फक्त दारिद्र्य पिकते, अशा मुलांना अविद्येच्या शापाचा अनर्थ लागू नये म्हणून शाहू परिवारातील सर्व प्राध्यापक एकाग्र भावनेने ज्ञानयज्ञ चालवत होते. महाविद्यालयाच्या प्रांगणात तरूण पावलांचे ठसे उमटु लागले. येणाऱ्या पावलांच भवितव्य काय? जाणाऱ्या पावलांची दिशा कोणती? हाच प्रश्न तेव्हा संस्थेसमोर होता. १९८४ पासून पुढे राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्रगतीची वाटचाल खऱ्या अर्थाने सुरू झाली. बारावीच्या परीक्षांतून अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत येऊ लागले. इथुन पुढे गुणवत्तेचा आलेख वाढतच गेला.

**शाहू पॅटर्न –**

महाराष्ट्रात लातूर विशेष करून एका शैक्षणिक पॅटर्न साठी ओळखले जाते. हा शैक्षणिक पॅटर्न म्हणजेच लातूर पॅटर्न होय. तो पूर्वी शाहू पॅटर्न या नावाने ओळखला जाई. राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी जिद्द, परिश्रम व महत्वाकांक्षेच्या जोरावर लातूर पॅटर्न चा धुमारा फुलविला व संपूर्ण महाराष्ट्रात भूषणावह अशी "आम्ही लातूरकर" म्हणून स्वतःची प्रतिमा निर्माण केली. मराठवाडा, लातूर, लातूर पॅटर्न ही नावे संपूर्ण राज्यात गाजली, ती अगदी सहजा सहजी नाही, तर यामागे जिद्दीचा इतिहास आहे. महाविद्यालयात प्राध्यापकांचे कौशल्य विकसित करण्यासाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले. कार्यशाळा, परिषदा, चर्चासत्रे घेण्यात आली. राज्यात व देशात प्राध्यापकांचे अभ्यास दौरे काढण्यात आले. इतर महाविद्यालयांमध्ये जे आहे आपल्याकडे नाही ते पाहण्यासाठी पाठवले. अनाथ मुलांसाठी निधी उभा केला.

**शाहू पॅटर्नची वैशिष्टये–**

**तज्ञ आणि मेहनती प्राध्यापक –**

या महाविद्यालयात प्राध्यापकांची निवड फक्त आणि फक्त गुणवत्तेच्या आधारावर केली जाते. यामुळे स्वतःची गुणवत्तेवर निवड झालेली पाहून अनुकूल परिसर व योग्य वातावरण यामध्ये प्राध्यापक स्वतःला पूर्ण झोकून देऊन काम करीत असलेला आपल्याला पहायला मिळतो.

**शैक्षणिक नियोजन –**

वेळापत्रकानुसार वर्षभरामध्ये उपलब्ध असणाऱ्या शिकवण्याच्या दिवसांची माहिती काढली जाते. त्यामुळे वेळेचा अपव्यय टाळता येतो. या नियोजनामध्ये अभ्यासक्रम निर्धारित वेळेत संपविण्यावर भर दिला जातो. कारण यानंतर काही वेगळे आणि पूरक उपक्रम घेण्यासाठी आवश्यक तो वेळ राखून ठेवावा लागतो.

**अध्यापन पद्धती –**

विद्यार्थ्यांना सर्वकष विषय समजावुन देण्यावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांची सर्व जबाबदारी संबंधित शिक्षकांवर टाकल्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांशी वैयक्तिक संपर्क ठेवावा लागतो.

**उपस्थितीची सक्ती –**

विद्यार्थ्यांवर उपस्थितीची सक्ती केली जाते. बहुधा इतर वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ती दिसून येत नाही. त्यामुळे काहींना असे वाटू शकते की, वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर उपस्थितीची सक्ती करून त्यांना शालेय जीवन जगायला लावले जाते की काय? परंतु असे मुळीच नाही. उलट याद्वारे राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचाच वारसा पुढे चालवला जात आहे.

**प्राध्यापकांसाठी कार्यशाळांचे आयोजन –**

राजर्षी शाहू महाविद्यालयात प्रशासन वेळोवेळी प्रत्यक्ष वर्गात जाऊन अध्यापनासंबंधी विद्यार्थ्यांच्या तकारींची नोंद घेते. प्राध्यापकांना त्यांच्या पाठाचे निरीक्षण करायला सांगितले जाते. अध्यापन कौशल्य व विद्यार्थ्यांची मानसिकता याला अनुसरून प्राध्यापकांसाठी कार्यशाळांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये अध्यापन पद्धतीवर सखोल चर्चा घडवुन आणली जाते. या उपक्रमामुळे अध्ययन व अध्यापनात राजर्षी शाहू महाविद्यालयाने अभिनव अध्यापन पद्धती विकसित केली आहे.

याशिवाय शैक्षणिक नियोजन, जादा तासिकेचे वेळापत्रक, विद्यार्थ्यांशी वैयक्तिक वेळापत्रक, शैक्षणिक सहली, विद्यार्थी पालक संयुक्त मेळावे, सराव परीक्षा, अभ्यासेतर उपक्रमांचे आयोजन ही शाहू पॅटर्नचीच वैशिष्टये आहेत. यामुळे गुणवत्तेचा आलेख वाढत गेला. महाराष्ट्र सरकारने संस्थेला सर्वोत्कृष्ट प्रमाणपत्र बहाल केलेले आहे. महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी प्रशासन, शिक्षक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर्स, राजपत्रित अधिकारी व वेगवेगळया विभागांत सर्वोच्च पदांवर विराजमान आहेत. ही महाविद्यालयासाठी खरोखरच गौरवाची बाब आहे. एकंदरित संस्थाचालकांची प्रेरणा व त्यांचा प्राध्यापकांवरील विश्वास या दोन्हींचा मेळ घालुन शिक्षणाच्या क्षेत्रात लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाने शिक्षणाच्या क्षेत्रात निर्माण केलेला दबदबा म्हणजेच शाहू पॅटर्न होय. आज शिक्षणाच्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालयाने आपले वेगळेपण जपले आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास देखील झाला पाहिजे, हाच ध्यास बाळगुन राजर्षी शाहू महाविद्यालय आपले कार्य करत आहे.

संदर्भ

१. वर्षिक अंक – शब्दगंध – १९७४–७५.
२. वर्षिक अंक – शब्दगंध – १९७७–७८.
३. वर्षिक अंक – शब्दगंध – १९८०–८१.
४. वर्षिक अंक – शब्दगंध – १९८२–८३.
५. वर्षिक अंक – शब्दगंध – १९९०–९१.
६. वर्षिक अंक – शब्दगंध – १९९४–९५.
७. वर्षिक अंक – शब्दगंध – १९९६–९७.
८. वर्षिक अंक – शब्दगंध – १९९७–९८.
९. वर्षिक अंक – शब्दगंध – १९९९–२०००.
१०. वर्षिक अंक – शब्दगंध – २०००–०१.
११. संपा. कावळे आर. एल., शोध गुणवत्तेचा लातूर पॅटर्नचे जनक प्राचार्य अनिरूद्ध जाधव गौरव ग्रंथ, जानेवारी २०००.